# पहाट आणि तुकाराम

-- चं. प्र. देशपांडे.



पहाट ( २५ कविता )

**पहाट कविता**

१

ही पहाट
अपूर्ण
पूर्ण होणारही नसते
तरीही मी म्हणतो सुंदर
तेव्हा ती
दिवसात रूपांतरित
होत असते

तिला नक्कीच
आवडलेले असते
मी सुंदर म्हणणे
पण तिचे जगणे
असते वेगळे

माहीत असते
उद्या नक्कीच
ती वाट पाहील
तिच्या जगण्यात
मूकपणे

पुन्हा स्वीकारण्यासाठी
माझे सुंदर म्हणणे

आता मधेच
तोडता नाही येणार
ती विद्ध होईल
बेफिकीर असली तरी

मलाच काळजी घ्यावी लागेल
२
ही पहाट
एक पूर्ण गाणे की
फक्त एक लकेर
सांगता नाही येत
मर्यादित असूनही
पूर्ण असणारी

ती सहजच सामावते
माझ्या मनात
पण जणू तिला नकळत
जणू अलिप्तपणे
जणू हा असावा फक्त
एक माझ्याच मनाचा भ्रम

तो अलिप्तपणा तसा तर
दोघांनाही माहीत असलेला

मला उद्युक्त करणारा
उत्तेजित, आक्रमक आणि

समाधानीही करणारा
चिडवणारा, संतप्त करणारा
आणि लीनही करणारा
हव्याशा सहवासासाठी

एकदा वाटते हा फक्त
आपलाच एकतर्फी
गोंधळ आहे पण असे कसे असेल
ती उगवतेच का मग माझ्या मनात
३
या पहाटेचा होकार असतो
पण अप्रत्यक्ष
तिची वस्त्रे प्रावरणे अलंकार
अव्यक्त – मलाच निर्माण करावे लागते
ते तिचे अमूल्य भांडार

ती लाजते की बुजते
की तिला नको असतो
टप्प्यासारखा पूर्णविराम
की ती एखाद्या काल्पनिक
सुरक्षिततेच्या मागे
लपते

हे सगळे मलाच घ्यावे लागते
किरणांसारखे विचारात
तिचे असणे निश्चित असल्याने
मी निश्चिंत असतो

तिला माहीत असतात

माझ्यात होणारे बदल
किनारा सोडून मी
तिच्या दिशेने सतत
सन्मुख राहण्याचे

कधी ना कधी
अटळ असलेले मीलन
आत्ताच भिनत चाललेले
फाकता प्रकाश होत शारीर
४
माझी पहाट
मला पहाटेच भेटली
अचानक सर्व गात्रे
उजळली

खरे तर ती
रागावली होती
उगवणारच नाही
असे म्हणाली होती

शांततेतच
तर होती
शब्दांबाहेर
सहज होती

हे समजल्याने
आता शब्दांना
अर्थ आला
माझ्या इच्छांना

मी फक्त किंचित
स्पर्श केला
तिचे ओठ विलगले
आमेन शब्द किरणला

निर्धास्त होत पुन्हा
मी जगू लागलो
हव्याशा अपूर्णतेत

५

आज तर दिवसभर
भेटत राहिली पहाट
रात्रभरही तयार होती थांबायला
उजेडाचा स्पर्श न होता

म्हणाली मी म्हणजे ती
कधी संपणारच नाही
आणि म्हणे
पक्ष्यांवर तिचे प्रेम आहे

मी मला हवा तसा
समजून घेतला अर्थ
तिला न सांगता
भरून घेतले मन

तिचा सगळा
रुक्षपणा कडकपणा
मावळला होता
सावयव मऊ झाली होती ती

जणू मी पाहुणा होतो

आणि ती विचारत होती

माझे हवेनको माझे विचार

जणू न कळता

आता ती माझी असेल

तिच्या कलाने उगवेल

पण मला हवी तितकी

राहील न उजाडता

६

मी दिवसभर कुठेही असलो

तरी तिचे लक्ष असते

ती असतेच सोबत एका अटीवर

स्पर्श नाही चालणार

खरे तर दंगल उत्स्फूर्त होती

असे म्हणता येते पण

पुढे नासधूस किती होईल

तिच्याकडून याला मी घाबरतो

ती मला समजल्यापासून

तिला जपायचे तर असतेच

ती किती नाजुक किती कणखर

किती परिपक्व आणि किती

सूड शिक्षा यांचे महत्त्व मानणारी

हे माहीत नसूनही

ती आहे प्रेमळच हे नक्की

किती छान वाटते ती
पण मी तिच्या रहस्यात प्रवेशण्याने
ती वेडी तर नाही होणार

मी कोण एवढा लागून गेलोय
सर्व घटनांतून सहीसलामत
जाणारा हवे ते न ठरवलेला

माझी पहाट घेईलच मला समजून
माझे अपराध पोटात घालत न बिथरता

७

रिकाम्या अवकाशाची भाषा
अवगत नसल्याने आम्हाला
तारे हेच शब्द होतात
किंवा ढग वा विजा

आमच्या लक्षांत येते की यांत
बिनचूक असे काहीच नाहीय
सांगितलेल्या निरोपांऐवजी
दुसरेच काही पोचवले जातेय

पण माझी प्रिय पहाट भाषा बदलायला तयार नसते
ताऱ्यांचाच वापर करून नेमके
परस्परांना हवे तेच अर्थ
पोचू शकतील ही तिची खात्री असते

मी म्हणातो अर्थ म्हणजे भूतकाळ
तू नव्याने बघ माझ्याकडे
तुझ्या स्वतःच्या प्रकाशात

तुझ्यातून मीच पडेन माझ्यावर

जणू खूप चर्चेनंतर
ती किंचित हसते
चर्चेत तथ्य नसल्याचे ओळखून
‘ हो ‘ म्हणते

विजय-पराजय कसला
हा असतो दोघांनाही
एकच अर्थ
कळण्याचा गोड क्षण

८

कधी सुखवणाऱ्या घटनांचे मुलायम पीठ
असे पिठूर चांदणे तर कधी पावसाळी दरारा
असते माझी विविधांगी अनिश्चित पहाट
जणू बुद्धशब्दांचे सत्य – काहीच नसते
टिकाऊ – बदलत असते सतत विश्वसर्वस्व

तिच्यामुळे मी शिकतो चकित न होणे
जे येईल ते स्वाभाविक म्हणून पाहणे
आणि तिला माहीत नसलेले माझे जगणेही
तिच्यासमोर नग्न ठेवणे तपासणीसाठी

ती मग्न असते जणू तिच्या मूडसमध्ये
तिचा एक स्वयंचलित प्रवाह
मी माझाही मानलेला त्यामुळे मला
विचलित न करणारा उलट
उत्तेजितच करणारा पण

तिला दिसतो माझा प्रवाह वेगळा
तिच्या स्वयंचलिततेत बाधा आणणारा
ती रागावते जाब विचारते वा फुरंगटून
दूर जाते जणू मला विनाशाची
धडकी भरवत

पण आता मी समजून चुकलोय
तपशीलांना खूप महत्त्व देणे
म्हणजेच ते नगण्य समजण्याची तयारीही असणे

जे करते माझी लाडकी प्रिय पहाट बिनबोभाट
९
पहाटा असतात तीन
खऱ्या आभासी आणि काल्पनिक
आणि मनाच्या भूतकाळात
खऱ्याच अनेक कल्पिलेल्या
त्यामुळे खूपच
आभासी खऱ्या

आता शारीरिक शक्यतांचा नसतो प्रश्न
कितीही मोठा असू दे पहाटखाना
सर्व पहाटांनी
माझी वाट पाहणे
आणि माझ्या सहवासांत खुश होणे
हेच असते सार्वकालीन मूल्य

इतक्या पहाटांमुळे
मी आपोआपच अलिप्त राहतो
माझ्या भावना

आणि माझी स्वभाववैशिष्ट्ये
महत्त्वाची राहात नाहीत

त्या कशा दिसतात वा वाटतात
हे महत्त्वाचे नाही राहात
माझ्या उगवण्यामुळे त्या होतात
असंख्य सूर्यफुले
हेच असते रहस्य मनोमन जगण्याचे

मी माझ्या मनातून बाहेर पडल्याशिवाय
या अविरत पहाटछळातून माझी सुटका नाही
१०
गहन अंधार तासंतास भेदावा
तेव्हा हाती लागते पहाट

रात्र किती काळ चालेल
किती दूरवर असेल प्रवास
हे इथे माहीत नसते
पण या रहस्यामध्येही
असते सुख
पहाट सापडण्याचे

रात्र आणि पहाट
यांचे असते संगनमत
पहाटेला वाटेल तेव्हा ती
रात्रीचा ताबा घेऊ शकते

सुरुवातीला हे क्वचित कधी घडते
नंतर वारंवारता वाढते आधी

मला वाटते की हे सहजच घडतेय
पण त्यातले चातुर्य लक्षात येणे तर
महाप्रचंड उत्तेजक असते

मध्यंतरीच्या काळात मी राग पचवतो
एखादा कडक नकारही सहन करतो
नकारच मान्य करून हळुवारपणे
पुढील प्रयत्नांना नेटाने तयार होतो

आता औपचारिकता संपलेली असते आणि
हो -- पूर्ण नकळत पहाट अवतरलेली असते
११
अरे वा
आजची सुरुवात तर खूप वेळ
छान झाली
खूप वेळ
ती एकदाही रागावली नाही
नाही म्हणाली नाही
कारण मी नुसताच
तिचे असणेच येऊ देत होतो
पूर्ण अनाक्रमक होतो

तिचा नाजुकपणा माहीत असूनही आणि
हवे म्हटले की काहीच मिळत नाही
हे माहीत असूनही
माझ्या मनाला ती हवीशी होतेच

अलिप्त नाहीच राहता येत मला
हे नाते अविभाज्य असूनही

ते शब्दांत मांडलेले नाही चालत तिला
तीच फक्त असावी आणि मी नसावेच
अशी अट्टल स्वार्थी आहे ती

मूर्त तर आहे हसतेही रुसतेही
कधी तिचा गुणगुणल्याचा आवाजही येतो
कधी तिची लांबसडक बोटे दिसतात

तिचे पक्षी तिला प्राणप्रिय आहेत हे मला माहीत आहे
माझी प्रिय पहाट – तिच्या पक्ष्यांचे पूर्ण हवेनको बघताना
तिचे माझ्याकडेही लक्ष आहे हे मला स्पष्ट जाणवत राहते
१२
छे छे पहाट म्हणजे
नुसतीच सूर्योदयापूर्वीची वेळ नव्हे
आणखी खूपच असते ती
निवांत
पण प्रगतीला जणू सिग्नल देत
हरकत नसणारी
पुढील सर्व
प्रेमवादळांना

पण शिस्त तिचीच असणार
कधी किती पावले
हे तीच ठरवणार

तिची ही उत्तेजक हुकुमशाही
मला नुसती मान्यच नसते तर
हवीही असते

तारे हळूहळू दिसेनासे होताना
आदराने तिला सलाम करत असतात
एवढ्या मोठ्या माहोलात मी कोण
निसर्गाची चावी जणू फक्त तिच्याच ताब्यात

मी तिचा होणार काय आहेच
हे तिला माहीत असते पण
ती आहे का माझी हे मला नसते माहीत
तिचाही निसर्ग असावाच बहुधा माझ्या ताब्यात

पण माझाच कब्जा घेऊन ती निभ्रांत असते
१३
ती माझी शिष्या असल्याचे म्हणत असली
तरीही
मीही काही कच्च्या गुरूचा चेला नाही
माझे डाव बऱ्याचदा तिलाही कळत नाहीत

( कळत नाहीत असे ती वरवर दाखवत असावी
ही शंका मला सुखावत असतेच )

संवादाची एक गंमत असते
तो फक्त चालू ठेवण्यात यश मिळायला हवे
की तो इच्छित दिशेने जातोच

आणि खूप फटी आणि मोकळ्या जागा
मिळत जातात बोलता बोलता
ज्यांचा खुबीने वापर केला तर
तिला जवळ येण्यावाचून गत्यंतरच नसते

विशेष म्हणजे जणू नकळत
ती सहज गुरफटत जाते
एखाद्या वेळी नको बाबा म्हणत
पसरत्या उजेडाचे कारण सांगून
पळूनही जाते

माझी पहाट
काय असते तिचे असणे म्हणजे तरी
सूर्योदयाची ललकारी की
माझा कडेलोट करणारी न्यायदेवता
की माझ्याच इच्छेचे मूर्त रूप
१४
काही घडणारच नसेल तर जाऊ दे मोडून
नकोच ते बिचकणे – तुटू दे –
असे म्हणून सांगूनच टाकले की
ती माझी प्रेयसी आहे – माझी
सतत हवीशी स्त्री

पहाटेच्या शांततेत लांबून
फक्त रेल्वे इंजिनाची एक शिट्टी ऐकू आली
त्या नादात तिचे उत्तर देणे राहूनच गेले
पण तिने माझे ते ऐकले तर होतेच नक्कीच

ती निसर्ग आहे तर मी का नसावे
तिचे सगळे स्वाभाविक आणि माझे मात्र
मुद्दाम हेतूपूर्वक असे कसे असेल

ती वाद नाही घालू शकत
ती फक्त उत्स्फूर्त असते

साधक बाधक बोलल्यास ती बिथरते

तिला वाटते मी सगळे विचारपूर्वक वागतो
नको कटकट म्हणून मग मीही
कारणे आणि विश्लेषणे यांना फाटा देतो
तिच्या नैसर्गिकतेपुढे अनैसर्गिक होतो
त्यामुळे मग ती सहज सस्मित राहू शकते

शेवटी सापळे तर विचारांनीच लावले जातात
तिच्या सर्व नैसर्गिकतेसह ती पडते
माझ्या जाळ्यात – तिचाच विजय झाल्याप्रमाणे

१५

माझे प्रेम म्हणजे भावनिक
धक्के देणे वा घेणे नाही
हे मी का सांगितले असावे
ते तिला स्त्रीत्वाच्या प्रतिमेमुळे
कळले नसावे --
तिच्या आढेवेढे घेण्याच्या काळात
मी दाखवूनही दिले
की एका क्षणात मी तिला
पूर्ण टाकू शकतो

पकडणारे काही असल्याशिवाय
कसले प्रेम – हा तर नुसता
भुकेलेपणा होईल
ती म्हणाली

कसेही काहीही केले तरी
प्रेमामुळे दुःख

हे नाहीच घडणार
मी म्हणालो

खरे तर निसर्ग म्हणून
तिला माहीत असणार
जगण्यातली अनिश्चितता
आणि दोन प्रतिमांचे अटळ वियोग

ती माझी प्रिय पहाट खरोखर रडली
आणि क्षणात डोळे पुसून म्हणाली
मीही आकाशातूनच आलेय
१६
पहाट आणि मी एकमेकांना
कळू नाही शकणार हे आम्हाला कळते
वायरिंगच वेगळे असल्यावर
प्रयत्न फोलच ठरणार

कुणीही कुणाला कळावे
अशी योजनाच नाहीय निसर्गात
कित्ती व्हास्ट फील्ड ओपन होते
त्यामुळे प्रेमासाठी

न कळण्याचे सौंदर्य
आणि जोडीला लिंगभेद
जबरदस्त होते तयार
रसायन कालातीत

एकाच मानसिक साच्यात
राहणे हे अनैसर्गिक आहे

हे आम्हाला कळते ( जरी तिला कमी )
लोक काय म्हणतील ते ओलांडून

खरे खोटे निष्ठा विश्वासघात
यांना नाही स्थान या विश्वात
जरी तिने सवयीने स्वीकारलेय
नीतीचे सुरक्षाकवच

किरकोळ असते माझे काही मागणे
जे त्या शिस्तीसाठी अव्हेरले जाते
मला खजिल आणि नाराज करत
आणि तिला बधीर आणि क्रूर

१७

मुळात ती माझी पहाट होती निसर्ग
तिचे काहीच जाणार नव्हते
क्षणात ती होऊ शकत होती
अहंकारहीन – त्यामुळे
माझ्यावर हल्ला करणे
तिला सहज शक्य होते
कारण झाला तर माझाच
फायदा झाला असता

तिच्याच निमित्ताने सुरू झालेल्या
माझ्या या कविता पाहून
ती म्हणाली की मी अहंकारी आहे
मी तिला कमी लेखतो

हे कसे चूक आहे अनेकदा
उलटच कसे आहे

हे मी तिला दाखवायचा प्रयत्न केला
तर ती फक्त हसली

इथे तरी सर्वांसमोर
मी तिच्यापुढे असणारे माझे न्यूनत्व
मान्य करतोय बिनशर्त

कविता तुझ्यासारखीच असते
तिच्याकडे मते आणि पूर्वग्रह
घेऊन जाता नाही येत
नम्र अनिश्चित हळुवार असावे लागते
-- मी तिला अनावश्यक अक्कल शिकवतो
१८
तिच्या विरहात राहणे
वा तिच्या आठवणीत राहणे
किंवा तिची वाट पाहात राहणे
माझ्या पहाटेला नाही चालत
-- एक तर पूर्ण तिच्यासह
वा पूर्ण तिच्याविना
हेच तिचे संबंधतत्त्व असते
-- नुसतेच – कालची तू
अधिक चांगली होतीस
असे म्हटले तरी ती लुप्त होते

आता मला ती नुसती माहीतच
झालेली नसून माझीच वाटते
त्यामुळे खरे तर माझ्यापुढे
एकच पर्याय  उपलब्ध आहे

पूर्ण तिच्यासह या एकमेव पर्यायासाठी
मला हजारो गोष्टी टाकाव्या लागतील
मी प्राणपणाने जपलेल्या जोपासलेल्या

मी तिला घाबरतोही
पण तिच्यासह असणे म्हणजे
या विश्वाचे सम्राट असणे
हेही भुरळ घालणारे असते

तिला अशी भुरळही नाही चालत
ती माझ्या मनाच्या चिंध्या करून
निघून जाते

१९

कधी ना कधी पाहिलेले
की पहाट असते प्रवाही
पण ती तशी माहितीही असते
स्थिर माझ्यात तिच्यासह
हळूहळू विरत जाणारी

ती नेमकी कधी संपते
तो बिंदू सापडत नसल्याने
कधीकधी भर माध्यान्हीपर्यंत
ती चालूच आहे असे मी समजत राहतो

लोकांना मी वेडा वाटतो -- एवढे काय
ते पहाटेचे कौतुक असे ते म्हणतात

पण ती कधीच
माझ्या बाजूने उभी नाही राहात

आणि हेही तिचे ठरवून नाही असत
हे समजते

ती अशीच कुठे कुठे पुढे पुढे
जात असेल पण वर्तमानात
-- पण मी स्थिर असल्याने
मला ती दुष्प्राप्य वाटते

सूर्याचा प्रश्न नसता तर
काळाचा प्रश्न नसता
मग मीलनच मीलन झाले असते
ही कल्पना मला मस्त वाटते
२०
मी कसा पिसाट आहे
हे कळूनही तिच्यात काहीच फरक पडत नाही
तिला ते माहीत असल्याचे सांगून
वर माझी पहाट मला आलिंगन देते

तुझ्याशीही मी एकनिष्ठ नसेन
फसवेन गुप्तता बाळगेन
माझे मन अनेक ठिकाणी वाटत सुटेन
असे नाही का वाटत – मी तिला विचारतो

ती हसते म्हणते मला काळ नाहीय
काल आज उद्या असे फाडत नाही मी मन
या क्षणी मी पूर्ण तुझी आहे

ही पहाट एखाद्या मत्सरी स्त्रीहून
प्रचंड धोक्याची आणि प्रचंड

विध्वंसक शक्तीची वाटते

याचा अर्थ माझ्या कृती
ती साठवतच नाही मनात
माझ्या स्मृती पुसून टाकते
मला ओॅळखणारही नाही ती
मग कुणाकुणांतला हा प्रेमसंबंध

तिच्या या अमर्याद औदार्याने
मी नष्ट होतो
आधी तिच्या चरणी लीन होऊन
मग तिला मिठीत घेतो

२१

आपुलकी आदर
प्रगल्भता आणि चातुर्य
यांच्या योगे होते क्रीडा
अत्युच्च जिवंत
लागतात चार चाँद

पहाटेला नसतात ते माहीत
माझ्याच मनात असते
त्यांचे उगवणे मावळणे
जरी तिचा असतो
शंभर टक्के सहभाग
आपोआप

निर्मितीचा हेतू नसतो
हीच असते निर्मिती
कृतीचा प्रत्येक क्षण

असतो सर्जक
कारण आता माझी पहाट
झालेली असते माझी कविता
कुणाच्याच मालकीची नसलेली

या तीव्र एकात्मतेत
खुले असतात सर्व धागे
अर्थांचे
माझ्या अनुभवाच्याही बाहेर
अनपेक्षित सरमिसळते
ओसंडून नष्ट होताना
सर्व कर्तृत्व

२२

पक्षी कुत्री वाहने
यांचे नीरवतेतले आवाज
जसे आहेत
तुझ्या शरीराबाहेरचे
तसेच ऐक
मनाबाहेर
जसे आहेत तसे
-- पहाट म्हणते

हे आवाज
कानांनी नको ऐकूस
तुझ्या अस्तित्वाने ऐक

हाच आहे मार्ग
दुःखाबाहेरचा
विषमता आणि अन्यायाबाहेरचा

युद्ध आणि हिंसेबाहेरचा

तुझ्या विचारांनी पकडत गेलास
इथले सगळे पृथ्वीवैभव
तर तुझे मन फाटून जाईल
आवाकाच थिटा पडल्याने
मग तू संतापशील
जरब बसवशील
इतरांना घाबरवत जगणे
हाच होईल तुझा अभिमान

मग मी असण्याला अर्थच काय तुझी
२३
कधी संध्यातारा तर कधी पहाटतारा
असणारा शुक्र
असतो सदोदित
आमच्या सोबत तो कुठेही असला तरी
-- आम्हा दोघांचे हे चैतन्यतत्त्व
प्रकाशमान करते
आमच्या मनांत
आकर्षणाचे चांदणे

मन निर्माण झालेय
ते मनानेही जगण्यासाठीच
विकार वासना भुका
यांचेही अस्तित्व मान्य करतच

ती आदर्शवादी नसते
तिला मनाचे घोळ माहीत असतात

तिलाही ते हवेही असतात

त्या क्षणाचा आधी वा नंतर विचार करणे
तिला मान्य नसते
तिच्या उपस्थितीत
तिचा प्रतिसाद असेल तरच
मग काहीही कितीही
हे असते तिचे जगणे

शुक्र असतो शांतच
शांततेतून देणारा
समृद्ध शृंगार
२४
वाट खूप झालीय चालून एकत्र
असे मला वाटते आता जे आहे
ते भावनेचे सातत्य प्रेमाच्या
म्हणजे आकर्षणाच्या
आणि खात्रीच्या साथीच्या वाटेचे

पण तिचे नसावे तसे
पहिल्या क्षणापासूनच
ती पूर्णच आहे सहभागी
खूप सहवास खूप काळ
या तिच्या लेखी
निव्वळ कल्पना आहेत

तिला ना आधाराची गरज
ना सुरक्षिततेची
माझी पहाट स्वतःच तर असते

निसर्ग पायाभूत
सर्व अस्तित्वाला

बिघडलेल्या हवेत
वा पावसाळी चिखलातही
ती अविचल असते
-- बिघडणार वा संपणार तर नाही
हे सगळे – हे फक्त माझेच विचार

अम्लान आश्वासन
आणि निर्भयतेची पेरणी
ही तिची वैशिष्ट्ये मला धीर देतात
माझ्या वाटेवर
२५
पहाटेचा निरोप नाही घेता येत
दिवसात मिसळून ती असतेच सोबत
आणि रात्र
ती तर असते पहाटेची निरोपदूत

पहाट सतत असते चोवीस तास
तिची शांतता भरून असते
व्यापतापांच्या कोलाहलातही
कुणा एखाद्या अनामिकाच्या
असण्यात तरी असतेच तिचे निशाण
घटनांना नेस्तनाबूत करणारे

मला होते इंटरेस्ट
या पहाटस्तुतीत
ती खुश व्हावी म्हणून नव्हे

तर तिचे सत्य उजागरावे म्हणून

ती सतत असतेच सगळीकडे
हे समजलेले असले तरी
मी नाही ना तसा
मला मर्यादांचे वेड आहे
त्यांच्या यातनांसह
-- या अर्थाने
मी विकृतही आहे

पण मला होत असतो तिचा स्पर्श
आणि अर्थात माझा तिला
ज्यामुळे मी भीत नाही माझ्या मनाला
--- ००० ---

आणि

## तुकाराम ( २५ कविता )

**तुकाराम कविता**

१

जखमा बऱ्या करत
नसते बसायचे रे बाळा
जखमा होण्याचा भागच
टाकून द्यायचा असतो
थुंकावाच लागतो तो
म्हणाले प्रिय तुकोबाराय

इथली अंधळी कोशिंबीर
रेल्वे लाईनच्या शेजारीच घर
असल्यासारखी अव्याहत

राहते वाहात मनात

तुला जगायचे असेल
तर मरावे लागेल
म्हणतात तुकोबाराय
तुझी ती आत्महत्येची
जी प्रेरणा म्हणतोस वो भी फेक दो

तू स्वतःला वृक्षवल्लींपासून
वेगळा खास समजणार
त्यांच्या सौंदर्याने मोहित होऊन
त्यांचा आनंद घेत राहणार
घुटक्याघुटक्याने पिकनिकला जाऊन
तर जा बाबा तुझी मर्जी
घे आनंदाने हवा तेवढा थकून

मी नाही तुला वाचवू शकत
म्हणतात तुकोबाराय
२
तुका म्हणे
फुटू नका
तुटू नका
फाटू नका
एकमेकांना विटू नका
झटू नका
कान किटले तरी
डोळे मिटू नका

देहानेही सुटू नका

आणि पळ म्हणूनही
सुटू नका
एकमेकांच्या जिवावर उठून
आपलेच म्हणणे
रेटू नका
मनाला जे वाटतेय
तेच खरे समजून
इतरांना वाटू नका

वाटूनघोटून
आपापले विचार
चाटू नका

मेटाकुटीला येऊन
वाट लावायला पेटू नका

सर्व एकच आहे म्हणजे काहीच नाही म्हणे
संशय फिटल्यावर अवघी रिकामीक आहे म्हणे
३
भविष्य जाणून घेऊन
तुकारामाला कर्कशा
टाळता नसती आली का
पण मग आदर्श अशी शोधणार कशी
आणि तुकाराम स्वतः
आदर्श असायला नको का

अवघा तो शकुन
हे म्हणणारा हा माणूस
अमुकच हवे

असे म्हणेल का

जगद्वंद्य सुपरस्टार
अमर कवी होणे
हा नसावाच हेतू त्याचा

कुठे काय झाले
कोण सुधारले
हे त्याला विचारायची सोयच नाही
तो म्हणेल मी
कुठे काय म्हणतोय
मै तो एक नाचीज हूँ

जे नाहीच आहे तो म्हणेल
त्यात सुधारायचे काय
४
दुःखच नको हे मान्य करणे
देवाच्या कुवतीतले कुठे असते
पालीपासून
वा डायनासोरपासून
बचाव व्हावा आणि
पुरेशी सहनशक्ती मिळावी
की बास

एक तर मूर्ती
नाहीतर जिवंत माणूस
कुणीही चालते
मध्यस्थ म्हणून
एखादा तर

देवा ऐवजीही

गुरूच वाहतो काळजी
गुरूच देतो यश
आणि हवे ते सर्व
शिष्य राहतो अधीन

आणि इकडे
तुकाराम झटकून हाकलून देतो
अधम लक्षण म्हणतो
गुरुशिष्यपण

५

बाँबवर्षावात चिंधड्या होऊन
मरणे परवडते
हवा पाणी अन्न विषारी करून
तडफडत मरणे परवडते
द्वेषात जळत मत्सरात काळवंडत
महत्त्वाकांक्षेच्या ताणाखाली
तुलनांच्या न्यूनगंडात
नष्ट होत जाणे परवडते

स्वतःच्या मुलांनाही अभिमानाने
याच कारखान्यात
ढकलणे परवडते

आगापिछा नसलेला तो
कुटुंब खलास झाले तरी
आपण जगरक्षक असल्याचा
आव आणत राहतो

तळ्यातमळ्यातही चालवून न घेणारा
मरणाचा प्रचार करणारा
कदापि न परवडणारा हा तर
आपला अटळ शत्रू
६
कसला भित्रेपणा
आणि कसले शौर्य
ऐकून घेणे
तर्का नाही ठाव
येथे रिघावया वाव

अस्मितेचा विचार असल्याशिवाय
भावना कशा दुखावतील
आणि शिवाय
या भावना दुखावणे योग्य आणि न्याय्य
पण त्या दुखावणे अमान्य
हेही असणारच ना नैतिक

निवडीचे स्वातंत्र्य असून उपयोग काय

कुणाचा द्वेष करणे योग्य याचा निर्वाळा
देऊ शकणारे रस्त्याकडेला
खिशात हात घालून उभे असतात आत्मविश्वासाने

दुर्लक्ष करत
७
पाठीराखे लोक
आज करतात त्याच्या अभंगांची गाणी

आणि करतात त्याला
उत्तुंग करमणुकीचा सम्राट
आणि बेधुंद उदबत्त्यांच्या धुरात
वाहतात त्याला हळुवार नम्रतेचे फूल

मानवी हक्क पशुसंगोपन
देशाचा झेंडा आणि जातीचा झेंडा
या सर्व ठिकाणी नम्र असणारी मने
तुकारामापुढेही लीन असतात
तशीच

वाऱ्या निघतात
उपास होतात
फुगड्या खेळल्या जातात

पण जाणवते तरीही सगळे
भंगलेलेच राहते
८
तुम्ही जुन्या हिंदी गाण्यांचे शौकीन असूनही
तुम्हाला आता तेही जराही सहन होत नाहीय
अशा नाजुक मनःस्थितीत असाल
तेव्हा तुकारामाचे नावही नका काढू
तो सततचा जिवंत ज्वालामुखी
भस्मसात करेल असा धोक्याचा आहे

थोडी तरी शक्ती थोडी तरी उभारी
लागेलच त्याच्या शब्दांसाठी
अन्यथा त्याला क्षणिक
वाईटही वाटेल तुमच्यासाठी

आणि तो पुढे निघून जाईल
चिडून काही विचाराल तर म्हणेल
मी नाही बाबा काही करत

एकविध आम्ही
न धरू पालट
असे म्हणत फार तर एकतारीवरून
तो विठ्ठलाला पाठवेल संदेश
की बाबा ये धावून याच्यासाठी
वर असेही म्हणेल की
क्षणभंगुर ते उपजली चिंता
खरी अखंडता आवडीची

तो वेडा वाट लावू शकतो

मराठीत जन्माला आलायत
तर मरा आता
अभिमानाने
९
" अगं तुकारामालाही त्याचा माल
खपवायचा असणारच ना
म्हणूनच म्हणाला असणार तो
' नाही देखिला तो डोळा
देव दाखवू सकळा ' "
बाप म्हणाला तरुण मुलीला
मजेत पिझ्झा खाता खाता

" पण माणूस खरा वाटतो "
मुलगी म्हणाली तर बाप म्हणाला

“ या जगात कुणावरही विश्वास ठेवायचा नाही
मी धरून सगळे खोटेच असतात “
“ मग तोही तेच तर म्हणतोय
व्हाट इज हार्म इन ट्राईंग “ मुलगी म्हणाली

“ ‘ आलिया आकारा अवघे नासे ‘
हे पटण्यासारखे वाटते “ मुलगी म्हणाली
“ अगं तो बहुमताच्या विरुद्ध होता
‘ मानियले नाही बहुमत ‘ म्हणतो तो
आपण तर लोकशाही महत्त्वाची मानतो
म्हणजे बहुमतच आणि समाजात
राहायचे असते आपल्याला शिवाय बघ
तो फुशारकी मारायचा की म्हणे
‘ मजहून नष्ट आहे ऐसा कोण ‘

ते काय लाईफ आहे का
त्याला लाईफच नव्हते हे लक्षात घे “
१०
जादूच्या सतरंजीवर बसून
घटना लिहिली
आणि स्पष्टच सांगितले
अयोग्य काही असताच कामा नये

तरी शिस्त राहीना

तज्ञ सल्ला म्हणून
तुकारामाला विचारले

तो म्हणाला विचारात नसतेच शिस्त

कोट्यवधींची डोकी
कुठल्याच  विचारात नाही बसणार

एक न्याय मंच काढला
सर्वच लोकांना हे आवडले

आता वाईट लोकांविरुद्ध
लढा उभारणे गरजेचे होते
वाईट कोण ते ठरवतानाच
हवा तो समूह एक झाला

निर्धार आणि शौर्य
यांची मजा येत राहिली
११
पुढारी म्हणाले
तुकाराम आपली माती आहे
या मातीत आपण जन्मलो
या मातीशी ईमान राखणे
हे आपले पहिले काम आहे

तुकाराम हीच तर आपली संस्कृती
तीच आपली मूल्ये
तीच आपली नैतिकता

तोच आपला झेंडा
तोच आपला फ्लेक्स
तोच आपले वर्गणीपुस्तक

तोच आपले कार्य

तोच तिकीट

तोच निकाल

पहिला पेढा त्यालाच

आपण रोज फूल वाहतो त्याला

तो जरी नाही म्हणत असला

तरी आपल्याला तो आहेच

काहीही होवो

आपण संस्कृती नाही सोडणार

मस्त खेळू शकतो आपण लेझिम

१२

मतभेद नुसते सगळीकडे

सुधारणा होत राहणे आयुष्यभर

हे कंटाळवाणे आणि दबावाचे वाटत राहिले

बुडता हे जन न देखवे डोळा

हे अशा वेळीच नेमके समोर

किराणा आणताना ठेच लागू शकते

एखादा वेडा दगड मारू शकतो

अवकाशयान बिघडून कुठेही कोसळू शकते

तसे झाले आयुष्य

ओळखीही नसलेले लोक शत्रू झाले

त्यांना खलास केले की बास असे झाले

हे समूहांनी घडू लागल्याने
लढाईचे स्फुरण लाभले

तुकारामाला काय वाटते
ते कुठे बघत बसणार
१३
जवळचे कुणी गेले
तर दुःखाचे श्रम पडतात
नोकरीधंदा तर श्रमाचाच
सर्व संबंधही श्रमांचेच
मत बाळगणे
आठवण बाळगणे
रांगेत उभे राहणे
प्रवास करणे
पटवून देणे
हरवलेल्या वस्तू शोधणे
गैरसमज दूर करणे
अपमानाची परतफेड करणे
आपल्या चुकीच्या वागण्याचे
काय होतील परिणाम
याची भीती बाळगणे
डावपेच करणे
आपण मजेत असल्याचे दाखवणे
वाट पाहणे चिंता करणे
विरहात पोळणे
मीलनात मस्तणे
कंटाळणे निराश होणे
आणि उज्ज्वल भविष्याची

स्वप्ने रंगवणे हे आणि असे खूप
हे सर्व खूप खूप परिश्रमाचे

तुकारामाचे बोल
नलगे श्रम चिंतना
हे खरे का मानावेत
१४
जगण्यात काहीही गूढ नसावे
हा माझा विचार
ऐकून एक मस्त चपळ खार
झाडावर चढून फांद्याफांद्यांतून
बेपत्ता झाली तर तुकाराम म्हणाला
देवाचे कारण देव जाणे

मी तापाने का फणफणलो
बरा तर होईन पण कशाला
हे मधेच तर तुकाराम म्हणाला
देवाचे कारण देव जाणे

माझ्यातले काही कायमचे कुचंबणेत
ते का तर तो म्हणाला
देवाचे कारण देव जाणे

एकाला वा जगाला
शाश्वती न वाटणे कसलीच
वगैरे वगैरे
असे का तर तो तेच म्हणाला

मला देवासारखी गूढ गोष्ट नको आहे

म्हणून मला तुकारामाचा संताप आला

ते पाहून मात्र तो काहीच नाही म्हणाला
१५
आघातांपासून स्वसंरक्षण करत
तर राहावेच लागणार

आपण तर करूच नाही इच्छित
कुणाच्याच सत्यावर आघात या गोडव्यात
घडत राहावेत सगळे संबंध आणि प्रसंग

हा नाजुकपणा जितका फायदेशीर
तितकाच कोणत्याही
आघाताने प्रचंड दुखावणारा
आणि आपल्या सत्यात काही
जानच नाही असा फील देणारा

आणि अशा माणसाला सांगतोय तुका
आघातावेगळा असे ठाव हा निराळा
जणू त्याचे नाहीच काही सत्य

मरू दे ते

मंद आचेवर उकळत
राहू दे माझे सत्य
१६
माझे दुःख खूप मोठे
तुला नाही कळणार
माझा अभ्यास खूप मोठा

मीच उपयोगी
मी परदेशात जाऊन आलोय
माझा अनुभव विशाल
तू संकुचित तू जातवादी
तू पक्षवादात गाडला गेलेला
दुःखामुळे काय कळते
अभ्यासामुळे काय कळते
अनुभवामुळे काय कळते

अशी सर्व देवघेव

अन्याय कुणावर होतोय
हाच विषय चालला पाहिजे
जगभर सतत चोवीस तास

आणि तुकाराम म्हणतोय
नाही ऐसा काळ केला आम्ही
आणि
नाही आता पर आप दोन्ही

१७

टाईम मशीनमधून
इतके मागे जाऊन तुकारामाला भेटणे
शक्यच नव्हते ही माझी तळमळ पाहून
तो स्वप्नात आला म्हणाला
काळाचा प्रश्नच नाही
कोणत्याही काळात कोणतीही माणसे
भेटूच नाही शकत
ती फक्त तोंडदेखले हसू शकतात

असेल बाबा मी म्हणालो
तुझ्या भेटीचे गाईड मिळते बाजारात
त्याचे सगळे नकाशे चुकीचे आहेत

गाथा आहे पण माझी एकतारी
तुला सापडणार नाही
तो म्हणाला

शब्द ना माझे ना तुझे

असे होईल
तेव्हा भेटून तरी करायचेय काय
असे म्हणून गेला निघून
१८
कथा करोनिया द्रव्य घेती देती
तयां अधोगती नरकवास
असे म्हणणाऱ्या तुक्या साल्या
तुला आमच्याकडून
झ्याट काही नको आहे
हे समजलेय पण तू
तू आमचा उपमर्द करतोयस
हे तुला समजलेले नाहीय

आम्ही आमचे प्रेम द्यायला तुला
तुझ्या मागे पळत येतोय
बेफिकीर निर्लज्जा

तुझ्याइतका क्रूर मित्र
जगात कुठे नसेल

काही बोलूच न देणारा

बुडू देत आमच्याही कविता चल
आणि हे सगळे पुरस्कार
१९
हं बोल मी म्हणालो
तर ती म्हणाली की आता
ती परत नाही फिरू शकणार
तिने पाळलेल्या सर्व प्राण्यांचा लळा सोडून
ती आलेली असल्याने
आता गजर झाला तरी
ती निर्धाराचे पांघरुण काढणार नाही

आता माझी पाचावर धारण
बसतेय की काय असे मला वाटले
मला हे असे अपेक्षितच नव्हते की
अचानक आकाशवाणी झाल्याप्रमाणे
ती सुखाची माळ होऊन
गळ्यात येऊन पडेल

मी आजूबाजूला पाहून कानोसा घेतला
हे निदान आपसांतच राहायला हवे होते
निसर्गातला असा कोणताही पदार्थ
वा साधा वारा का असे ना
अचानक अनपेक्षितपणे
असे काही अनुकूल होणे हे एक संकटच होते

मी गांगरलेलो भांबावलेलो असतानाच
तिथे तुकाराम उसाचा रस पीत बसलेला दिसला

अरे म्हटले तू इकडे कुठे तर म्हणाला
दिङ्मूढतेची जाणीव जिथे कुठे जन्माला येईल
तिथे असतोच मी जवळपास कारण क्षणात तिथे
अदृश्य होता येते

२०

माझ्या संरक्षणासाठी मी केलेल्या
माझ्या विचारांमुळेच माझ्यावर हल्ले होतात
हे पाहून कुठेतरी
शरण जावेसे वाटले

तरीही पिढीजात सवयी म्हणतात अमृततुल्यच चांगला
बाहत्तर प्रश्नांवर किंवा प्रश्नांना बेनकाब करणारा
शेर मला पाठ नाहीय म्हणून मी निमूट मागे उभा आहे

सर्वच माणसांची घरे रक्ताने माखलेली नाही दिसत का

हळूहळू सुधारणा करत हजारो वर्षे गेली
पण माणसे विचारांनी जखमी होणे काही थांबले नाही

यावर दुकानदार पुजारी अभिनेता आणि नेता
अशा सर्वांनीच हात वर केल्यामुळे शेवटी
तुकारामाला विचारले की बाबा आहे का काही भवितव्य

तर तो म्हणाला की
त्याला काळ नाही दिसत

२१

मुळात जगण्यात सौंदर्य येण्यासाठी
सूर्यासारख्या बाहेरच्या वस्तूची गरजच काय
दुःखाचे मूळ या सगळ्या

मानसिक हालचालींत आहे तुकाराम म्हणतो

आपल्याला रोज असा सूर्यास्त दिसावा
म्हणून एकाची खिडकीच समुद्राभिमुख असते
ते पाहून दुसरा जळफळतो एक दिवशी
उगवेलच असा सूर्य की ती खिडकी
जळून खाक होईल म्हणतो

तुकारामाला क्षणभर वाईट वाटते
आपण उपकारापुरतेच उरलेले आहोत
हे त्याला जाणवत  असावे
२२
दुःखाने उचंबळून आलेले हृदय
गोंधळून विचका झालेला मेंदू
अपघाताने मोडतोड झालेली हाडे
भांडणांनी पेटलेल्या दंगली
न्यायासाठी चेतवलेले द्वेष
नष्ट करा नष्ट व्हा
या तत्त्वासाठी तयार निराशायुक्त पलटणी
दगडफेकीवर गोळीबार करणारे
एकनिष्ठ शिपाई
शहरेच्या शहरे गिळंकृत
करायची हाव असलेले
नेते आणि व्यावसायिक

रंगामुळे बहिष्कृत
जातीमुळे हेटाळले जाणारे
स्थलांतरित म्हणून
अपमानित जगणारे

अपेक्षाभंग झालेले

पराभूत झालेले

असाध्य रोगाने जर्जर असणारे

प्रेमभंगाने वेडे झालेले

आणि अनाथ आणि पोरके

शिवाय या सगळ्यासह

यातही थोडेफार आनंदी दिसणारे

सर्व जातात शरण तुकारामाला

परक्या

२३

मन एका वेळी दोनच कामे करू शकते

हे तो समजून होता गरिबांना

त्याने टाळ आणि नाम दिले

गोंगाटमुक्तीच दिली

आणि सर्व गोंगाट जाऊ शकतो

याचा अर्थच इशारा काफी है

असे केले

पवित्र ते अन्न हरिचिंतनी भोजन

असे म्हणत त्याने स्मित केले

सर्वात भारी म्हणजे

हो कां दुराचारी वाचे नाम जो उच्चारी

त्याचा दास मी अंकित कायावाचामनेसहित

नसो भाव चित्ती हरिचे गुण गातां गीतीं

करो अनाचार वाचे हरिनामउच्चार

असे म्हणून त्याने
गोंगाटाला आव्हान दिले

जसे मानसोपचारतज्ञ सांगतो
सर्व काही ठीक आहे – असे म्हणत राहा सतत

जाऊ द्या तो तुकाराम वाटते
मरना तो है ही एक दिन
२४
आणि तरीही आताच्या जिवंतपणात
वयभराचे प्रभाव

तुकाराम म्हणाला की मृत्यू
ही काही एक शेवटची घटना नाहीय

नाही देखिला तो डोळां देव दाखवू सकळां
असे म्हणत त्याने उडवून लावले
दिसणारे जग
२५
तुकाराम सार ऐका हे अपार
जगण्याचा भार टाकावया
मन हेच केंद्र फेका हो बाहेर
देवाचे माहेर स्वतःच व्हा
देवाचे अस्तित्व म्हणजे नास्तित्व
रिकामीक सत्त्व जगण्याचे
वनांतरी जाणे सुखांना मुकणे
नको मुळी सुकणे संसाराचे
ठायीच बैसोन करा एकचित्त
घरी सत्य वित्त सहजची

फावला एकांत एकविध भाव
अवघेचि भेव नष्ट आता
स्मरणाच्या साठी वेळचि नसावी
सर्वकाळ व्हावी भेटगाठ
भेद तो नासला अहंकार गेला
चित्ती देव आला हेचि सर्व
देव तेचि पुण्य अदेव ते पाप
रिकामे ते माप असू द्यावे
आता व्हावे जल देवाची जी मर्जी
जावे मनमौजी सर्वासवे
अवघेचि शुभ माझे नाही काही
मला नाही काही क्षोभचिंता
लागला हा झरा अखंडचि वाहे
तुका म्हणे ध्यावे पूर्ण विश्व
प्रत्यक्ष कृतीचे सुंदर सौष्ठव
शब्दाचा गौरव कामा न ये
तुका म्हणे आता निवांतचि राही
पाहिले ते पाही परतोनी
--- ००० ---